MAHARASHTRA CARROM ASSOCIATION
Regd. No. E 9070 Mumbai | Pan : AAATM 5948 F
Affiliated to All India Carrom Federation | Recognised by Maharashtra Olympic Association & Maharashtra Kreeda Parishad
C/o. Arun Kedar, 38/975, Adarsh Nagar, Prabhadevi, Mumbai - 400 030
Mob. : 99870 45429 | Email : carrom.mca1954@gmail.com | www.maharashtracarromassociation.com

# स्पर्धा व सर्वसाधारण मार्गदर्शिका

१. महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित करण्यात येणाऱ्या वरिष्ठ राज्य अजिंक्यपद, मानांकन, रॅपिडो कॅरम सुपर ६ किंवा जोड जिल्हा कॅरम स्पधेसाठी आयोजकांनी राज्य संघटनेस संलग्न असलेल्या स्थानिक कॅरम संघटनेशी संपर्क करून त्याच्या शिफारशीने आपला अर्ज स्पर्धा शुल्क रु. २०,०००/- च्या धनादेशासोबत / रोख रकमेसहित महाराष्ट्र कॅरम संघटनेकडे पाठवावा. तसेच स्थानिक संघटनेकडे स्पर्धा शुल्क रु. १०,०००/- चा धनादेशाद्वारे / रोखीने भरणा करावा. राज्य अजिंक्यपद स्पर्धेच्या सांघिक गटाचे प्रवेश शुल्क राज्य संघटनेकडे वळते करण्यात येतील. सब जुनियर व जुनियर राज्य अजिंक्यपद गटाकरिता स्पर्धा शुल्क रु. १०,०००/- प्रत्येकी आकारण्यात येतील. जिल्हा संघटना स्पर्धा शुल्क रु. ५,०००/- प्रत्येकी आकारेल.

२. राज्य संघटना स्पर्धेसाठीचे प्रवेश अर्ज स्पर्धेचा तक्ता / गुणपत्रिका, कॅरम, स्टॅण्ड, लॅंप स्टॅण्ड, सोंगट्या, बोर्ड क्रमांक, कॅरम पावडर व स्पर्धेसाठीची इतर सामुग्री पुरवेल यासाठी राज्य संघटना संलग्न स्थानिक संघटनेची मदत घेईल. राज्य व जिल्हा संघटना एकमेकामध्ये समन्वय साधून स्पर्धा आयोजकांना स्पर्धा यशस्वी करण्यास मदत करतील.

३. स्पर्धेचे सहभाग व प्राविण्य प्रमाणपत्राचा खर्च आयोजकांनी करावा. तसेच प्रमाणपत्र छापण्यापूर्वी त्यावरील मजकुर राज्य संघटनेकडून मंजूर करून घ्यावा.

४. राज्य संघटनेमार्फत स्पर्धेसाठी प्रमुख पंच, सहाय्यक प्रमुख पंच, स्पर्धा निरीक्षक व स्पर्धा संचालकाची नियुक्ती करण्यात येईल.

५. स्पर्धेसाठी नेमलेल्या १ प्रमुख पंच १ किंवा २ संयुक्त प्रमुख पंच, स्पर्धा निरीक्षक, स्पर्धा संचालक, राज्य असोसिएशनचे मानद सचिव किंवा १ प्रतिनिधी, समालोचक व तात्रिंक कर्मचारी (व्हिडिओ ग्राफर), याच्या रेल्वे वा बसचे येण्या-जाण्याचा प्रवास खर्च, निवास व्यवस्थेचा खर्च, तसेच त्याच्या चहापाण्याचा व भोजनाचा खर्च आयोजकांनी करावा. आयोजकांनी स्पर्धेच्या कालावधीमध्ये रुपये १,५००/- प्रमाणे या सर्वांना मानधन यावे. स्पर्धेच्या एक दिवस अगोदर यापैकी जर कोणी येणार असेल व स्पर्धेच्या दुस-या दिवशी यापैकी जर कोणी जाणार असेल तर त्यास या दिवसाचे रुपये ५००/- प्रमाणे मानधन देण्यात यावे.

६. स्थानिक संलग्न असोसिएशनचे सचिव / १ प्रतिनिधी यांना स्पर्धेच्या कालावधीत रुपये १,५००/- प्रमाणे मानधन देण्यात यावे तसेच त्यांच्या चहा नाश्ता व भोजनाची व्यवस्था आयोजकांनी करावी.



President: Jitendra Shah • Chairman: Bharat Desadla • Hon. Secretary: Arun Kedar • Treasurer : Ajit Sawant
Vice President: Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
Hon. Joint Secretary: Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
M.C. Member: Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan
DONATION EXEMPT U/S 80G

७. राज्य अजिंक्यपद राज्य मानांकन व जोड जिल्हा स्पर्धेच्या प्रवेश अर्जावर राज्य असोसिएशनची कार्यकारिणीची, आयोजक, जिल्हा असोसिएशनचे पदाधिकारी व प्रमुख पंच, सहाय्यक प्रमुख पंच यांच्या नावाचा उल्लेख असेल.

८. स्पर्धेत वापरण्यात येणा-या कॅरम सामुग्रीचा प्रवेश अर्जात उल्लेख करण्यात येईल.

९. स्पर्धेसाठीचा स्टेजवरील व गेटवरील बॅनरवर राज्य व जिल्हा असोसिएशनचे नाव व लोगो बंधनकारक आहे. यासाठी आयोजकांनी बॅनर छापण्या / लावण्यापूर्वी सदर मजकुर राज्य संघटनेकडून मंजूर करून घ्यावा.

१०. राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये प्रत्येक जिल्ह्याचा पुरुष व महिला तसेच १४ व १८ वर्षाखालील मुले व मुली यांचा प्रत्येकी ६ खेळाडूंचा संघ तसेच कॅडेट व युथ गटात प्रत्येकी २ खेळाडूंचा समावेश असेल. या संघातील खेळाडूंची तसेच एक पुरुष व एक महिला संघव्यावस्थापकाची निवास व्यवस्था स्पर्धा कालावधीत आयोजकांमार्फत करण्यात येईल.

११. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी एकेरी गटाचे प्रवेश शुल्क रुपये ७००/- व सांधिक गटासाठी प्रवेश शुल्क रुपये ३,५००/- आकारण्यात येतील. १८ वर्षाखालील मुला / मुलीने राज्य स्तरीय वरिष्ठ गटाच्या स्पर्धेत भाग घेतल्यास त्याला ५०% सवलत देण्यात येईल.

१२. प्रतिवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीसाठी खेळाडू नोंदणी शुल्क रुपये १००/- आकारले जातील.

१३. स्पर्धा खेळताना / स्पर्धेच्या कालावधीत स्पर्धेच्या आवारात व निवास व्यवस्थेच्या ठिकाणी कोणत्याही खेळाडू वा संघ व्यवस्थापकाने दारू, मावा, गुटका, तंबाखू, सिगारेट सारख्या व इतर अमली पदार्थाचं सेवन केलेले आढळल्यास त्यास दोषी ठरवून स्पर्धेतून ताबडतोब बाद करण्यात येईल. तसेच त्याला / तिला संघटनेच्या कारवाईस सामोरे जावे लागेल.

१४. स्पर्धेमध्ये भाग घेणाया खेळाडूने स्पर्धा कालावधीत स्पर्धा खेळताना उद्घाटन समारंभाप्रसंगी व पारितोषिक विजेत्या खेळाडूंनी पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी नियमाप्रमाणे पांढरा टी शर्ट गणवेश म्हणून परिधान करणे बंधनकारक आहे.

१५. गणवेशावर पुढील बाजूस खिशावर किवा खिशाच्या जागी जिल्ह्याचा जास्तीत जास्त ३ इंच व्यासाचे लोगों / नाव असावे. तसेच मागील बाजूसही जास्तीत जास्त ३ इंच व्यासाचा लोगो वा ३ इंच उंच व १० इंच रुंद जिल्ह्याचे नाव छापण्यात यावे. टी-शर्टच्या बाहुवर प्रायोजकाचे ३ इंच नाव / लोगो छापण्यास लावण्यास मुभा असेल. टी शर्टच्या कॉलरवर व बाजूवर छोटीशी रेष असेल तर तो गणवेश मान्य केला जाईल परंतु इतर कोणतीही फॅशन वा चित्र सफेद टी-शर्टवर असल्यास तो गणवेश



President: Jitendra Shah . Chairman: Bharat Desadla . Hon. Secretary: Arun Kedar . Treasurer : Ajit Sawant
Vice President: Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
Hon. Joint Secretary: Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
M.C. Member: Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan
DONATION EXEMPT U/S 80G

म्हणून मान्य केला जाणार नाही. गणवेशाचे पालन सर्व जिल्ह्यानी आपापल्या जिल्ह्यामधील स्पर्धेमध्ये करावे.

१६. स्पर्धेच्या हॉलमध्ये पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त खेळाडूंनी कोणतीही खाण्याची वा पिण्याची वस्तू आणू नये. तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, ग्लास व अन्य कोणताही कचरा स्पर्धेच्या आवारात टाकू नये.

१७. पारितोषिक वितरण समारंभास उपस्थित नसलेल्या खेळाडूचे बक्षीस राज्य संघटनेकडे वळते केले जाईल. अशा बक्षिसपात्र खेळाडूने स्पर्धेनंतर एका महिन्याच्या कालावधीत पारितोषिक मागणीसाठी लेखी अर्ज केल्यास व तो मानद सचिवाना समाधानकारक वाटल्यास त्याला त्याचे बक्षीस दिले जाईल.

१८. राज्य अजिंक्यपद मानांकन व जोड़ जिल्हा स्पर्धेसाठी नियुक्त केलेल्या तांत्रिक संचालक / स्पर्धा निरीक्षकांनी स्पर्धेचा अहवाल संपूर्ण निकाल व उद्घाटन आणि पारितोषिक वितरण समारंभ व सामन्यादरम्यानची छायाचित्रे स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसाच्या आत असोसिएशनकडे / राज्य मानद सचिवाकडे पाठवावेत.

१९. प्रमुख पंचानी स्पर्धेनंतर त्वरित स्पर्धेचा संपूर्ण निकाल, स्पर्धेचा ड्रॉ व मुख्य फाईल स्पर्धा संचालक / स्पर्धा निरीक्षक यांच्याकडे सुपूर्द करावी.

२०. स्पर्धा निरीक्षक, स्पर्धा संचालक, प्रमुख पंच, सहाय्यक प्रमुख पंच व जिल्हा प्रतिनिधी यानी खेळाडू गणवेश परिधान व अमली पदार्थ सेवन या दोन्ही नियमांचे काटेकोरपणे पालन होत असल्याचे पाहणे व त्यावर नियंत्रण ठेवणं आवश्यक आहे.

२१. कोणत्याही खेळाडूची निवास व्यवस्था आयोजकामार्फत केली जाणार नाही.

२२. स्पर्धेचा प्रवेश अर्ज जिल्हा संघटना व खेळाच्या माहितीसाठी स्पर्धेपूर्वी www. maharashtracarromassociation.com या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. याची सूचना संलग्न जिल्ह्यातील सचिव / प्रतिनिधींना ईमेल, मेसेज, व्हॉट्स ॲप द्वारे देण्यात येईल.

२३. स्पर्धेचा ड्रॉ तक्ता स्पर्धेपूर्वी किमान ३ दिवस अगोदर जिल्हा संघटना व खेळाडूंच्या माहितीसाठी www.maharashtracarromassociation.com या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

२४. स्पर्धा कालावधीमध्ये स्पर्धेच्या आवारात स्वताःचा सामना नसताना कोणीही सराव करू नये. अशी कृती करणाया खेळाडूस असोसिएशनच्या कारवाईस सामोरे जावे लागेल.



President: Jitendra Shah . Chairman: Bharat Desadla . Hon. Secretary: Arun Kedar . Treasurer : Ajit Sawant
Vice President: Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
Hon. Joint Secretary: Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
M.C. Member: Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan
DONATION EXEMPT U/S 80G

२५. स्पर्धेच्या आवारात पूर्व परवानगीशिवाय खेळाडूने वा प्रेक्षकाने कोणताही कॅरम सामुग्री विकण्यास बंदी आहे.

२६. प्रमुख पंच, सहाय्यक प्रमुख पंच, तसेच राष्ट्रीय व राज्य पंचानी स्पर्धेच्या कालावधीत गणवेश परिधान करणे आवश्यक आहे.

२७. राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बोर्ड पंच म्हणून काम करणाया पंचास रुपये १००/- प्रमाणे मानधन देण्यात येईल.

२८. बोर्ड पंचास दिलेल्या मानधनाची रीतसर नोंद प्रमुख पंच, संयुक्त प्रमुख पंच यानी ठेवावी.

२९. प्रमुख पंच/संयुक्त प्रमुख पंच यांनी स्पर्धेचा ड्रॉ / तक्ता व वेळापत्रक तयार करण्यास मदत करावी.

३०. १८ वर्षांवरील सर्व खेळाडूंनी फुल पँट परिधान करणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धेमध्ये खेळताना पुरुष गटातील खेळाडूंनी गणवेशाच्या आत फुल शर्ट परिधान करू नये. खेळाडू व बोर्ड पंच योग्य गणवेश परिधान करत असल्याची खात्री / नोंद प्रमुख पंच / सहाय्यक प्रमुख पंच / स्पर्धा संचालक स्पर्धा निरीक्षक यांनी ठेवावी.

३१. स्पर्धेदरम्यान कोणीही बोर्ड पंचाशी, प्रमुख / संयुक्त प्रमुख पंचाशी किवा आयोजक वा पदाधिकाऱ्यांशी गैरवर्तन करू नये.

३२. स्पर्धकांनी निवास व्यवस्थेच्या ठिकाणी कोणतेही गैरवर्तन / धूम्रपान किंवा अंमली पदार्थाचे सेवन करू नये तसेच खेळाडू व व्यवस्थापक वा पदाधिकाऱ्याशिवाय निवासस्थानी कोणीही पूर्व परवानगी शिवाय राहू नये. नियमाचे पालन न केलेल्या खेळाडूस / व्यक्तीस असोसिएशनच्या कारवाईस सामोरे जावे लागेल.

३३. स्पर्धेच्या सामन्याबाबत वेळेची सूट देण्याची / नाकारण्याची मुभा केवळ प्रमुख पंच, संयुक्त प्रमुख पंचांना आहे.

३४. गुणपत्रिका संपूर्ण लिहिण्याची, सामना संपल्यावर दोन्ही खेळाडूंची स्वाक्षरी गुणपत्रिकेवर घेण्याची व गुणपत्रिकेवर स्वतःचे नाव लिहून स्वाक्षरी करण्याची जबाबदारी बोर्ड पंचाची असेल. शिवाय सामना सुरु होण्यापूर्वी सोंगटया व गुणपत्रिका बोर्डावर नेणे व सामना संपल्यावर ते प्रमुख पंचापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी बोर्ड पंचाची असेल, प्रमुख पंचानी सोंगट्या व गुणपत्रिका बरोबर असल्याची खात्री करूनच बोर्ड पंचांचे मानधन मंजूर करावे.

३५. प्रत्येक खेळाडूने सामना खेळण्यापूर्वी आपला स्ट्रायकर प्रमाणित करून त्यावर स्पष्ट दिसेल असा शिक्का मारून घ्यावा.



President: Jitendra Shah • Chairman: Bharat Desadla • Hon. Secretary: Arun Kedar • Treasurer : Ajit Sawant
Vice President: Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
Hon. Joint Secretary: Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
M.C. Member: Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan
DONATION EXEMPT U/S 80G

३६. स्पर्धेदरम्यान बोर्ड पंचाने दिलेला एखादा निर्णय खेळाडूस मान्य नसल्यास त्याने प्रमुख पंचाकडे दाद मागावी, प्रमुख पंचाचा निर्णय मान्य नसल्यास खेळाडूने नियमाप्रमाणे निषेध शुल्क (Protest fee) रुपये ५००/- भरून स्पर्धा कमिटीकडे लेखी दाद मागावी.

३७. स्पर्धा आयोजकांनी दिलेले आसन खेळाडूनी खेळण्यासाठी घ्यावे त्याची उंची वाढविण्यासाठी त्यांनी एका पेक्षा जास्त आसनांचा (खुर्चांचा/टेबलचा) वापर करू नये.

३८. खेळाडूने अथवा अन्य व्यक्तीने पान, मावा, गुटका, तंबाखू, मद्यपान सारखे पदार्थाचे सेवन करून स्पर्धेत खेळल्यास किवा स्पर्धेच्या आवारात, तसेच शौचालयात घाण केलेली आढळल्यास त्यावर आवश्यक ती कारवाई केली जाईल.

३९. स्वतःचा सामना नसताना बोर्डावर स्ट्रायकर टेस्ट करणे, खेळणे व केवळ स्पर्धेच्या आवारात गप्पा मारणे यामुळे इतरत्र चालू असलेल्या सामन्याला आपल्यामुळे त्रास होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यावी.

४०. स्पर्धेच्या ठराविक सामन्यांचे चित्रीकरण करून ते महाराष्ट्र असोसिएशनच्या युटयूब चॅनेलवरून प्रसारित करण्यात येईल. पूर्व परवानगीशिवाय राज्य संघटनेव्यतिरीक्त कोणीही सामन्यांचे अथवा स्पर्धेच्या आवारात कोणतेही चित्रीकरण / व्हिडीओ शुटींग करू नये.

४१. स्पर्धेमध्ये नावे नोंदविण्याची अंतिम मुदत संपल्यानंतर कोणाचीही नावे स्विकारली जाणार नाहीत.

४२. स्पर्धेच्या प्रवेश अर्जातील सर्व रकाने पूर्णपणे भरणे अनिवार्य आहे. प्रवेश अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये.

४३. १ ते ८ क्रमवारी निश्चित करण्यासाठी खेळविण्यात येणारे सामने न खेळणा-या खेळाडूस मिळणा-या गुण व पारितोषिकापासून वंचीत राहावे लागेल.

४४. राज्य अजिंक्यपद वा अन्य स्पर्धेत वयस्कर गटात खेळणाया खेळाडूस त्या स्पर्धेतील सांघिक व इतर गटात भाग घेता येणार नाही.

४५. प्रतिवर्षी स्पर्धेमध्ये भाग घेणा-या खेळाडूची संपूर्ण माहिती, खेळाडू नोंदणी अर्जात पूर्णपणे भरून फोटो सहीत राज्य कॅरम संघटनेकडे पाठविणे अनिवार्य आहे. तसेच खेळाडूस दिलेले ओळखपत्र त्याने स्पर्धेच्यावेळी सोबत बाळगणे आवश्यक आहे.

४६. कॅरमचे स्पर्धेबाबतचे इतर नियम अखिल भारतीय कॉरम महासंघाच्या Laws of Carrom प्रमाणे आहेत.



**President:** Jitendra Shah • **Chairman:** Bharat Desadla • **Hon. Secretary:** Arun Kedar • **Treasurer :** Ajit Sawant
**Vice President:** Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
**Hon. Joint Secretary:** Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
**M.C. Member:** Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan

DONATION EXEMPT U/S 80G

४७. राष्ट्रीय पातळीवरील वा अन्य कोणत्याही स्पर्धेसाठी राज्याचा संघ निवडताना त्या स्पर्धेमध्ये नावे देण्याची अंतिम मुदत असलेल्या तारखेच्या अगोदर झालेल्या १२ महिन्यातील राज्य अजिंक्यपद व राज्य मानांकन स्पर्धेतील गुणकोष्टकाच्या आधारावर त्यांच्या क्रमवारीनुसार खेळाडूंची निवड केली जाईल.

४८. प्रत्येक राज्य अजिंक्यपद स्पर्धेनंतर नवीन मानांकन असोसिएशनच्या संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल व नंतरच्या मानांकन स्पर्धेतील गुण प्रविण्यानुसार त्यात जोडले जातील.

४९. राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये राज्याचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवड झालेल्या संघाला वर्षातून एकदा गणवेश देण्यात येईल. तसेच या संघाचे प्रवेश शुल्क, येण्या जाण्याचा प्रवास खर्च व दैनदिन भत्ता असोसिएशनमार्फत दिला जाईल.

५०. इतर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये राज्याचे प्रतिनिधीत्व करणाया खेळाडूंना गणवेश म्हणून टी शर्ट देण्यात येईल तसेच प्रवेश शुल्क, येण्याजाण्याचा खर्च असोसिएशनमार्फत करण्यात येईल.

५१. राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये राज्याचे प्रतिनिधीत्व करणा-या सर्व गटांतील खेळाडूंनी वैयक्तिक गटामध्ये प्राविण्य प्राप्त केल्यास क्रमवारीनुसार प्रथम रुपये १०,०००/-, व्दितीय रुपये ७,०००/- व तृतीय रुपये ५,०००/- प्रमाणे तर संघास क्रमवारीनुसार प्रथम रुपये २१,०००/- व्दितीय रुपये १४,०००/- व तृतीय रुपये १०,५००/- रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येईल.

५२. राज्य पंच परीक्षा दरवर्षी वरिष्ठ राज्य अजिंक्यपद स्पर्धेदरम्यान आयोजित करण्यात येईल. याकरिता पंच परीक्षा शुल्क रुपये १०००/- सहित उमेदवाराने आपल्या जिह्याचे शिफारसपत्र जोडून अर्ज करणे आवश्यक आहे. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारास प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

५३. राज्याच्या विविध जिह्यांमध्ये कॅरमचा प्रसार कारण्याहेतु दरवर्षी २ दिवसांचे पंच व कार्यकत्यांचे शिबीर आयोजित करण्यात येईल.

५४. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना संघासोबत प्रवास करणे व संघासोबत राहणे बंधनकारक आहे. याचे पालन न करणाया खेळाडूला संघातून वगळण्याचा अधिकार असोसिएशनला आहे.

५५. राष्ट्रीय स्पर्धेपूर्वी प्रशिक्षण शिबीर आयोजित केल्यास खेळाडूचा सहभाग आवश्यक असून सहभागी न झालेल्या खेळाडूस संघातून वगळण्याचा अधिकार असोसिएशनला आहे.

५६. राज्य, राष्ट्रीय वा अन्य कोणत्याही स्पर्धेमध्ये गैरवर्तन केल्याचे आढळल्यास अशा खेळाडू, व्यवस्थापक व पदाधिका-याला असोसिएशनच्या कारवाईस सामोरे जावे लागेल.



President: Jitendra Shah . Chairman: Bharat Desadla . Hon. Secretary: Arun Kedar . Treasurer : Ajit Sawant
Vice President: Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
Hon. Joint Secretary: Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
M.C. Member: Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan
DONATION EXEMPT U/S 80G

५७. राज्याचे प्रतिनिधित्व करणा-या खेळाडूने असोसिएशनने दिलेला गणवेश स्पर्धा कालावधीत परिधान करणे बांधकारक आहे.

५८. राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये थेट संस्थेचे प्रतिनिधित्व करणा-या खेळाडुंनी राज्याच्या संघामध्ये निवड झाल्यास राज्यातर्फे खेळणार असल्याबाबतचे पत्र दरवर्षी ३१ मे पर्यंत देणे आवश्यक आहे. खेळाडूने विहित मुदतीत राज्य कॅरम संघटनेला लेखी न कळविल्यास तो किंवा ती खेळाडू राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये त्यांच्या संस्थेचे प्रतिनिधित्व करणार आहे असे गृहीत धरून राज्य संघटना त्याची निवड करणार नाही.

५९. असोसिएशनच्या संकेतस्थळावर राज्याच्या स्पर्धा व इतर उपक्रमांचा अंदाजित कार्यक्रम सर्वांच्या माहितीसाठी उपलब्ध असेल.

६०. प्रत्येक जिह्याने आपल्या जिल्हा संघटनेच्या / संस्थेच्या नावे अधिकृत ईमेल आयडी तयार करून महाराष्ट्र कॅरम असोसिएशनला लेखी कळवावे. भविष्यात या ईमेलवरच संलग्न जिल्हा संघटनेशी संपर्क केला जाईल. तसेच आपल्या जिह्याच्या अध्यक्ष / सचिव व खजिनदारांचे संपूर्ण नाव पत्ते व ईमेल आयडी व दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक आपल्या असोसिएशनच्या शीर्षकपत्रावर अध्यक्ष व सचिव यांच्या स्वाक्षरीने कळवावे.

६१. सर्व जिल्हा संघटनानी आपापल्या जिह्यामध्ये प्रतिवर्षी सर्व गटातील खेळाडूंकरिता जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा व किमान १ वरिष्ठ गटाची जिल्हा मानांकन स्पर्धा आयोजित करणे अनिवार्य आहे. अशा स्पर्धेबाबतची माहिती राज्य कॅरम असोसिएशनला आगाऊ द्यावी. आवश्यक वाटल्यास राज्य कॅरम असोसिएशन या स्पर्धेसाठी निरीक्षक पाठवेल. अशा निरीक्षकाचा येण्याजाण्याचा खर्च, निवासाचा खर्च व चहा नाश्ता भोजनाचा खर्च जिल्हा असोसिएशनने करावा.

६२. सर्व असोसिएशनने घटनेप्रमाणे आपापल्या निवडणुका विहित मुदतीत घेणे आवश्यक आहे. तसेच त्याची पूर्वसूचना राज्य कॅरम असोसिएशनला देणे आवश्यक आहे. आवश्यक वाटल्यास राज्य कॅरम असोसिएशन याकरिता निरीक्षकाची नेमणूक करेल. अशा निरीक्षकाचा सर्व खर्च जिल्हा कॅरम असोसिएशनने करावा. वेळोवेळी या नियमांचे पालन न करणा-या संघटनेवर राज्य संघटनेची कार्यकारिणी योग्य ती कारवाई करण्याबाबत निर्णय घेईल.

६३. प्रतिवर्षी संलग्न जिल्हा कॅरम असोसिएशनने जिल्हा संलग्न शुल्क ३० एप्रिल पूर्वी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या खात्यामध्ये जमा करून त्याची सूचना मानद साचिवांना द्यावी.

६४. पांढया टी शर्टच्या गणवेशाचे बंधन सर्व जिल्ह्यामधील स्पर्धांमध्ये करण्यात यावे.



President: Jitendra Shah • Chairman: Bharat Desadla • Hon. Secretary: Arun Kedar • Treasurer : Ajit Sawant
Vice President: Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
Hon. Joint Secretary: Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
M.C. Member: Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan

DONATION EXEMPT U/S 80G

६५. सर्व जिल्ह्यांना सक्रिय कारण्याहेतू खेळाडूंनी आपापल्या जिल्ह्यामध्येच खेळणे अनिवार्य आहे. परंतु नोकरीनिमित्त खेळाडूची इतरत्र बदली झाली असल्यास व त्या जिह्यामध्ये त्याच्या संस्थेची संलग्नता असल्यास अशा खेळाडूला त्या जिल्ह्याने खेळविण्यापूर्वी योग्य ती कागदपत्रांची पडताळणी व वास्तव्याचा पुरावा पाहून त्याला / तिला खेळण्यास परवानगी देण्याबाबत निर्णय घ्यावा.

६६. राज्य अजिंक्यपद स्पर्धेमध्ये संलग्न जिह्याचे प्रतिनिधित्व अनिवार्य आहे. सलग २ वर्षे सहभाग न घेतल्यास अशा जिल्ह्याबाबत अकार्यक्षम जिल्हा म्हणून योग्य ती कारवाई केली जाईल.

६७. जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व अधिकृत स्पर्धामध्ये राज्य/राष्ट्रीय संघटनेने मान्यता दिलेले कॅरम सोंगटया व इतर सामुग्रीचा वापर करणे अनिवार्य आहे.

६८. स्पर्धेच्या आवारात असणा-यांनी आपल्यामुळे स्पर्धेत कोणताही व्यत्यय येणार नाही याची काळजी घ्यावी.

६९. प्रतिवर्षी राज्य अजिंक्यपद स्पर्धेनंतर नवीन मानांकनास सुरुवात होईल.

७०. खेळाडूने विहित मुदतीत ३१ मे पर्यंत संस्थेतून राज्यात वा राज्यातून संस्थेसाठी बदली मागितल्यास त्याची मंजुरी देण्यासाठी रुपये १,०००/- शुल्क आकारण्यात येतील.

७१. महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम क्रमांक १६ गुण, द्‌वितीय क्रमांक १४ गुण, तृतीय क्रमांक १२ गुण, चतुर्थ क्रमांक १० गुण, पांचवा क्रमांक ८ गुण, सहावा क्रमांक ६ गुण, सातवा क्रमांक ४ गुण, आठवा क्रमांक २ गुण व उपांत्यपूर्व फेरीसाठी प्रत्येकी १ गुण देण्यात येईल. राज्य स्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक ८ गुण, द्‌वितीय क्रमांक ७ गुण, तृतीय क्रमांक ६ गुण, चौथा क्रमांक ५ गुण, पांचवा क्रमांक ४ गुण, सहावा क्रमांक ३ गुण, सातवा क्रमांक २ गुण, आठवा क्रमांक १ गुण दिले जातील व उपांत्यपूर्व फेरीसाठी प्रत्येकी ½ गुण देण्यात येईल.

७२. जोड जिल्हा व इतर बिगर मानांकित स्पर्धेसाठी गुण दिले जाणार नाहीत. या स्पर्धेसाठी त्या वेळच्या राज्यस्तरीय गुणांकनाप्रमाणे मानांकने दिली जातील.

७३. राज्यात रॅपिडो कॅरम सुपर ६ नावे कॅरम स्पर्धा आयोजित केली जाईल. या स्पर्धेचा कालावधी २ किंवा ३ दिवसांचा असेल. ६ बोर्डाचे ३ सेट याप्रमाणे सामने खेळविले जातील. कॅरम खेळाची लोकप्रियता वाढविण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याने या स्पर्धेत कोणतेही गुण देण्यात येणार नाहीत. केवळ रोख पारितोषिकके देण्यात येतील. इतर नियम व अटी स्पर्धेच्या पत्रकावर नमूद करण्यात येतील.



President: Jitendra Shah . Chairman: Bharat Desadla . Hon. Secretary: Arun Kedar . Treasurer : Ajit Sawant
Vice President: Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
Hon. Joint Secretary: Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
M.C. Member: Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan
DONATION EXEMPT U/S 80G

MAHARASHTRA CARROM ASSOCIATION
Regd. No. E 9070 Mumbai | Pan : AAATM 5948 F
Affiliated to All India Carrom Federation | Recognised by Maharashtra Olympic Association & Maharashtra Kreeda Parishad
C/o. Arun Kedar, 38/975, Adarsh Nagar, Prabhadevi, Mumbai - 400 030
Mob. : 99870 45429 | Email : carrom.mca1954@gmail.com | www.maharashtracarromassociation.com

७४. राज्य कॅरम असोसिएशनने तयार केलेल्या नियम/अटी व मार्गदर्शिकेचे पालन न करणाया खेळाडू पंच पदाधिकारी संलग्न जिल्हा संघटनांवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार निर्बंध घालण्याची कारवाई करण्यात येईल.

**अरुण केदार**
मानद सचिव

दिनांक : १४ ऑगस्ट २०२४



President: Jitendra Shah . Chairman: Bharat Desadla . Hon. Secretary: Arun Kedar . Treasurer : Ajit Sawant
Vice President: Dhananjay Sathe, Girish Tulpule, Manzoor Ahmed Mahemood Khan, Pradeep Bhatkar, Yatin Thakur
Hon. Joint Secretary: Abhijeet Mohite, Dattaprasad Shembekar, Iqbal Nabi Khan, Ketan Chikhale, Yogesh Phansalkar
M.C. Member: Anand Khare, Ashutosh Dhodmise, Jitendra Dalvi, Santosh Chavan

DONATION EXEMPT U/S 80G